# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/००१३३०**

**अपिलार्थी श्री. विनय वामन हुले**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता (जी/उ विभाग)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (जी/उ विभाग)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २७.०५.२०२६</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १४.११.२०२४ | ०१.०१.२०२५ | ०७.०३.२०२५ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १०.०६.२०२५ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०१.०१.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थींनी दि. १४.११.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार आपल्या अभियंत्रिकी विभागत द्वारकामाई एस आर ए सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या). या भुभाग क्रमांक ५३८, अंतिम भुभाग क्रमांक १६३ माहिम विभाग टि.पि.एस ३, भगत लेन, माहिम (प), मुंबई ४०००१६. या सदर इमारतीतील सदनिका क्र. १४०१ व १४०२ व सदनिका क्र. १५०१ व १५०२ या १४ व्या व १५ व्या मजल्यावरील PAP सदनिका मध्ये केलेल्या अनधिकृत नियमबाहय, बेकायदेशीर रित्या बांधकाम केल्याप्रकरणी विकासक माईटी इंजिनियर्स डेव्हलपर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर्स व वास्तूविशारद गजेंद्र डोलारे मेसर्स इनटॅक डिझाइन यांनी सदर इमारतीतील सदनिका क्र. १४०१ व १४०२ व सदनिका क्र. १५०१ व १५०२ या १४ व्या व १५ व्या मजल्यावरील PAP सदनिका मध्ये केलेल्या अनधिकृत नियमबाहय, बेकायदेशीर रित्या बाधंकाम नियमित /(Regularization) करण्यासाठी आपल्या अभियंत्रिकी विभागात दि. २६.११.२०२१ रोजी ते आजरोजी पर्यंत दाखल केलेल्या सुधारीत नकाश्याच्या सर्व व संपुर्ण प्रती सत्य छायांकित करुन मिळाव्यात. (२)द्वारकामाई एस आर ए सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या). या भुभाग क्रमांक ५३८, अंतिम भुभाग क्रमांक १६३ माहिम विभाग टि.पि.एस ३, भगत लेन माहिम (प), मुंबई ४०००१६. या सदर इमारतीतील सदनिका क्र. १४०१ व १४०२ व सदनिका क्र. १५०१ व १५०२ या १४ व्या व १५ व्या मजल्यावरील PAP सदनिका मध्ये केलेल्या अनधिकृत नियमबाहय, बेकायदेशीर रित्या केलेले बांधकाम (Regularization) करण्यासाठी

..२/-

मा. मुख्य कार्यकार अधिकारी झोपुप्रा यांनी दिलेल्या मान्यतेच्या सर्व व संपुर्ण प्रती सत्य छायांकित करुन मिळाव्यात. (३) द्वारकामाई एस आर ए सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या). या भुभाग क्रमांक ५३८, अंतिम भुभाग क्रमांक १६३ माहिम विभाग टि.पि.एस ३, भगत लेन माहिम (प), मुंबई ४०००१६ या सदर इमारतीतील सदनिका क्र. १४०१ व १४०२ व सदनिका क्र. १५०१ व १५०२ या १४ व्या व १५ व्या मजल्यावरील PAP सदनिका मध्ये केलेल्या अनधिकृत नियमबाहय, बेकाय नियमित /देशीर रित्या केलेले बांधकाम (Regularization) करण्यासाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी झोपुप्रा यांनी दिलेल्या मान्यतेनंतर झो.पु.प्रा. कार्यालयातून वेळोवेळी निर्गमीत केलेल्या प्रसिध्द केलेल्या परीपत्रकाच्या व कार्यालयीन आदेशाच्या अनुषंगाने विकासकाकडून आकारण्यात आलेल्या दडांच्या (Penalty) च्या रक्कमेची पोच पावतीच्या सर्व व संपुर्ण प्रती छायांकित करुन मिळाव्यात याबाबत माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना दि ०१.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले की, आपल्या अर्जात विचारणा केलेली माहितीबाबत या विभागाच्या अभिलेखावरील प्रथम दर्शनी उपलब्ध माहिती विनाशुल्क सोबत जोडून देण्यात येत आहे. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.०७.३.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, द्वारकामाई एस आर ए सहकारी गृहनिर्माण इमारतीतील १४ व १५ व्या मजल्यावरील अनधिकृत बेकायदेशीर बांधकामाविषयी ३ मुद्दयांवर माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये मुद्देनिहाय पूर्ण माहिती मिळालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतलेली नाही.

४. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास काही उशिर झाला असल्यामुळे त्यांनी दि. ०१.०१.२०२५ रोजी अपिलार्थींना निशुल्क माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

५. अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये नकाशा तसेच विकासकाने भरलेल्या दंडाची पावती याविषयी माहिती उपलब्ध नाही.

६. श्री. गोविंद मगर, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी यापुढे अपिलार्थींच्या प्रत्येक प्रथम अपील अर्जावर माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतूदीनुसार विहित मुदतीत सुनावणी घेऊन जर एकापेक्षा जास्त विषयाची माहिती मागितली असेल तर स्वतंत्र आदेश पारित करण्याची दक्षता घ्यावी.

७. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना त्यांच्या माहिती अर्जातील ३ मुद्दयांचे स्पष्ट मुद्देनिहाय उत्तर / माहिती आदेशप्राप्तीच्या १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने निशुल्क उपलब्ध करुन द्यावे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

27-5-2026

**मुंबई**
**दिनांक : २७.०५.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**